॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon


## जनसंपर्क विभाग

जळगाव २६ (     ) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या परीक्षांना सोमवारपासून प्रारंभ होत असून त्या पार्श्वभूमीवर कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी शुक्रवारी परीक्षा सुरळीत व्हाव्यात या दृष्टीने संलग्नित महाविद्यालयांच्या प्राचार्यांची बैठक घेवून सूचना केल्या.

विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहात झालेल्या या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा.पी.पी.माहुलीकर, कुलसचिव भ.भा.पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा.ए.बी.चौधरी उपस्थित होते. यावेळी बोलताना कुलगुरू प्रा.पी.पी.पाटील यांनी विद्यापीठाच्या परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त करून परीक्षा केंद्रांवर कोणत्याही प्रकारच्या असुविधा राहणार नाहीत याकडे लक्ष देण्याची सूचना केली. प्रा.माहुलीकर यांनी विद्यापीठाच्या वाढत्या आलेखाला अनुसरून परीक्षा व्हाव्यात अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रा.ए.बी.चौधरी यांनी परीक्षेसंदर्भातील सर्व सूचना यावेळी केल्या.

---

जा.क्र. : कबचौउमवि/16/हस्तदेय /2018 दिनांक : 26 ऑक्टोबर, 2018

प्रति,

**मा. संपादक / प्रतिनिधी,**

कृपया, उपरोक्त बातमी आपल्या दैनिकात प्रसिध्द करण्यात यावी, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरीत //--

(डॉ.सुनील पाटील)

जनसंपर्क अधिकारी